प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑक्टोबर 23, 2019

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 35 अ खालील निर्देश - भाग्योदय फ्रेंड्स अर्बन को–ऑपरेटिव बँक लि. वरुड, जिल्हा - अमरावती, महाराष्ट्र – मुदतवाढ**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 56 सह वाचित कलम 35 अ च्या पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, जनहिताच्या दृष्टीने, भाग्योदय फ्रेंड्स अर्बन को–ऑपरेटिव बँक लि. वरुड, जिल्हा - अमरावती, महाराष्ट्र ह्यांना जानेवारी 17, 2019 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून निर्देश दिले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेने आता ह्या निर्देशांना, पुनरावलोकनाच्या अटीवर आणखी सहा महिन्यांची म्हणजे, ऑक्टोबर 18, 2019 ते ऐवजी एप्रिल 17, 2020 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ह्या निर्देशांमध्ये, ठेवींची निकासी/स्वीकार ह्यावर काही निर्बंध आणि/किंवा मर्यादांच्या अटी घालण्यात आल्या आहेत. संबंधित जनतेच्या माहितीसाठी सविस्तर निर्देश वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आले आहेत. परिस्थितीवर अवलंबून ह्या निर्देशात बदल करण्याचा विचार भारतीय रिझर्व्ह बँक करु शकते. हे निर्देश देण्यात आले ह्याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे असा घेण्यात येऊ नये. तिची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत वरील बँक, तिचा बँकिंग व्यवसाय निर्बंधांसह करणे सुरु ठेवू शकते.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/1011**